ePaper

पाच राज्यांच्या रणसंग्रामाची तयारी; निवडणूक आयोग मैदानात!

वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827




महाईन्यूज (TM)



पान 3 वरुन...

पिंपरी-चिंचवड महापालिकेत मोठ्या प्रमाणावर पदोन्नत्या

WWW.MAHAENEWS.COM | गुरुवार, दि. 17 सप्टेंबर 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## “मेलो तरी हटणार नाही, उद्या १ वाजता १०० टक्के मुंबईला जाणार”

# मनोज जरांगे आंदोलनावर ठाम

महाईन्यूज । मुंबई

**“मी उद्या मुंबईला निघणार, मेलो तरी हटणार नाही. आजच निघणार होतो पण नारायणगडाच्या महंतांनी केलेल्या विनंतीला मान देऊन सलाईन लावले. पण, उद्या मी एक वाजता १०० टक्के मुंबईला जाणार म्हणजे जाणार, असे मनोज जरांगे पाटील म्हणाले. जरांगे पाटलांनी घेतलेल्या पत्रकार परिषदेतून त्यांनी मुंबईत जाण्यावर ठाम असल्याचे सांगितले. दरम्यान, यावेळी त्यांनी आंदोलकांना सध्या तरी माघारी जाण्याचे आवाहन केले. “मला जाण्यास अडवल्यास बोलवून घेतो”, असेही जरांगे पाटील म्हणाले.**

“मला उठता, बसता नाही येत, हाता-पायात प्रचंड आग होतेय. मी आज जाणार होतो पण, जाता आले नाही. पण, उद्या मी एक वाजता १०० टक्के मुंबईला जाणार म्हणजे जाणार. मराठ्यांनी मुंबईत कधी यायचे याची तारीख देखील आजच जाहीर करणार होतो पण, सरकारने ड्राफ्ट केलाय असं कळतंय ते पाहून मी त्याचीही घोषणा करणार”, असे जरांगे पाटील म्हणाले. “१८ तारखेला आझाद मैदानावर जाण्यास कोण अडवतंय आणि नंतर मराठ्यांना बोलवतो”, असे पाटील पुढे म्हणाले. पाटील यांनी यानंतर पुढला मुक्काम न करता थेट मुंबईत दाखल होणार असल्याचे सांगितले.

मनोज जरांगे पाटील १७ सप्टेंबर रोजी बीडमधील पाटोद्यातून निघणार आहेत आणि १८ सप्टेंबर रोजी मुंबईच्या वेशीवर पोहोचणार आहेत. त्यांनी बुधवारी रात्री याबद्दलची घोषणा केली. ऐन गणेशोत्सवात मराठा आंदोलक येण्यावर ठाम असल्याने आता सरकारकडून हालचाली वाढल्या आहेत. सरकारचे शिष्टमंडळ मनोज जरांगे पाटील यांची पाटोद्याच भेट घेणार असल्याची माहिती समोर आली.

अंतरवाली सराटीतून निघाल्यानंतर मनोज जरांगे यांची प्रकृती बिघडली होती. त्यांच्यावर १६ सप्टेंबर रोजी दिवसभर उपचार करण्यात आले. त्यानंतर सायंकाळी त्यांनी पत्रकार परिषद घेऊन मुंबईत आंदोलन करण्याचे जाहीर केले. ठरलेल्या दौऱ्यात आता बदल करण्यात आले असून, कुठेही न थांबता मुंबईच्या वेशीवर पोहोचणार असल्याचे त्यांनी जाहीर केले.

दरम्यान, मनोज जरांगे यांनी मुंबईला जाण्याबद्दलचा निर्धार बोलून दाखवल्यानंतर राज्य सरकारकडून हालचाली सुरू झाल्या आहेत. उद्योगमंत्री उदय सामंत हे परदेशात असून, त्यांनी ऑनलाईन प्रणालीद्वारे मनोज जरांगे यांच्याशी संपर्क केल्याची माहिती आहे.

राज्य सरकारकडून मनोज जरांगे यांना मागण्यासंदर्भातील कार्यवाहीचा मसुदा दिला जाणार आहे. कॅबिनेट मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, आमदार प्रसाद लाड यांच्यासह शिवसेनेचे मंत्री असे शिष्टमंडळ मनोज जरांगे यांची भेट घेणार असल्याचे समजते.

मनोज जरांगे यांची पाटोद्यातच शिष्टमंडळ भेट घेणार आहे. मनोज जरांगे यांच्यासोबत जाहीरपणे चर्चा करणार आहे. त्यांच्या मागण्या आणि सरकारकडून करण्यात आलेली कार्यवाही याची माहिती दिली जाणार असल्याची माहिती आहे. मनोज जरांगे हे १७ सप्टेंबर रोजी दुपारी १ वाजता पाटोद्यातून निघणार आहेत. त्यामुळे शिष्टाई करून मुंबईतील आंदोलन थांबवण्यासाठी दुपारपर्यंतचा वेळ सरकारकडे राहिला आहे. यामुळे मुंबईतील आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर सरकार आणि मनोज जरांगे पाटील यांच्यातील चर्चेला आता अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे.




### आंदोलकांना मुंबईत न येण्याचे आवाहन

जरांगे पाटील यांनी यावेळी आंदोलकांना मुंबईत न येण्याचे तसेच रस्त्यात न थांबण्याचे आवाहन केले. हार किंवा फुलं नको असेही पाटील म्हणाले. शिवराळ भाषेबद्दल विचारले असता जरांगे पाटील यापूर्वी चांगले बोलत होते त्याबाबत मंत्रिमंडळाच्या बैठकीत चर्चा नाही का झाली? असा सवालही त्यांनी उपस्थित केला. “१३ पैकी १२ मागण्या मान्य झाल्या सांगतात पण, हैदराबाद गॅझेटचं प्रमाणपत्र वाटप नाही, वैधता देत नाही. हैदराबादचा जीआर सुधारीत करुन द्या”, अशी मागणी जरांगे पाटील यांनी केली.



### तर सरकार पडू शकतं – जरांगे पाटील

“पश्चिम महाराष्ट्रात नेहमीच अपमान केला जातो, त्यांना आरक्षणाची गरज नाही असं सांगितले जाते. पण, पश्चिम महाराष्ट्रात लोक संतापले आहेत”, असे जरांगे पाटील म्हणाले. तसेच, पाटलांनी मराठा आंदोलकांनी रस्त्यावर थांबण्याची आणि गाड्या उभ्या न करण्याचे आवाहन केले आहे. माझं मुंबईत वेळेत पोहोचणे आवश्यक आहे. मला जर अडवलं तर मी तुम्हाला बोलवून घेतो, असे पाटलांनी आंदोलकांना आवाहन केले.”सरकार आणि मराठा समाज यांच्या धुसफूस सुरु आहे, किती भायण चित्र निर्माण होऊ शकतं. लाठीचार्ज वैगेरे झाला तर सरकार पडू शकतं”, असे जरांगे पाटील पोलिसांनी आंदोलनाबाबत मागितलेल्या तपशीलावरुन बोलताना म्हणाले.

# वेतनासाठी न्यायालयीन कर्मचाऱ्यांचा एल्गार!

## काळी फीत लावून शासनाचे लक्ष वेधले; सुधारित वेतनश्रेणीची मागणी

**महाईन्यूज । बारामती**

**उच्च न्यायालय, मुंबई यांच्या अधिपत्याखालील दुय्यम न्यायालयांतील कर्मचाऱ्यांना उच्च न्यायालयातील कर्मचाऱ्यांप्रमाणे सुधारित वेतनश्रेणी लागू करावी, या मागणीसाठी पुणे जिल्ह्यातील न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी बुधवारी (दि. १६) काळी फीत लावून आंदोलनाला सुरुवात केली. 'समान काम, समान वेतन' या संवैधानिक व न्याय्य तत्त्वाच्या आधारे ही मागणी करण्यात आली आहे.**



महाराष्ट्र राज्य न्यायिक लघुलेखक संघटना, पुणे जिल्हा बेलिफ संघ, पुणे जिल्हा न्यायालयीन कर्मचारी संघटना आणि पुणे जिल्हा न्यायालयीन चतुर्थश्रेणी कर्मचारी संघटना या चारही संघटनांनी संयुक्तपणे आंदोलनाची भूमिका घेतली आहे. या मागणीसंदर्भातील प्रस्ताव दीर्घकाळापासून शासन दरबारी प्रलंबित असून, वारंवार पाठपुरावा करूनही त्यावर सकारात्मक निर्णय झालेला नसल्याचे संघटनांचे म्हणणे आहे.

या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्य न्यायालयीन कर्मचारी महासंघाने यापूर्वी दिलेली आंदोलनाचा इशारा वजा संपाची नोटीस पुन्हा शासन आणि उच्च न्यायालय प्रशासनास सादर केली आहे. त्यानुसार आंदोलनाच्या पहिल्या टप्प्यात बुधवारी सकाळी ९.३० वाजता जिल्ह्यातील संबंधित न्यायालयांच्या मुख्य प्रवेशद्वाराबाहेर कर्मचाऱ्यांनी काळी फीत लावून शांततापूर्ण व शिस्तबद्ध आंदोलन केले.

लघुलेखक, लिपिकवर्गीय कर्मचारी, बेलिफ, चतुर्थश्रेणी कर्मचारी तसेच सेवानिवृत्त न्यायालयीन कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले. आंदोलनानंतर निर्धारित कार्यालयीन वेळेत कर्मचारी आपापल्या कक्षात उपस्थित राहून न्यायालयीन व प्रशासकीय कामकाजात सहभागी झाले. मागणीवर शासनाकडून पुढील निर्णय काय घेतला जातो आणि आंदोलनाची पुढील दिशा काय असेल, याकडे आता लक्ष लागले आहे.

### सुधारित वेतनश्रेणीची मागणी

उच्च न्यायालयातील कर्मचाऱ्यांप्रमाणे दुय्यम न्यायालयांतील कर्मचाऱ्यांनाही सुधारित वेतनश्रेणी लागू करावी, अशी प्रमुख मागणी आहे. समान कामासाठी समान वेतन मिळावे, या तत्त्वावर कर्मचाऱ्यांनी आंदोलन छेडले.

# गणेशोत्सवातील वैद्यकीय, हिरकणी कक्षांच्या निविदांवर प्रश्नचिन्ह!




**महाईन्यूज । पुणे**

**गणेशोत्सवासाठी वैद्यकीय कक्ष आणि हिरकणी कक्ष उभारण्यासाठी पुणे महापालिकेच्या झोन क्रमांक ५ ने सुमारे १ कोटी ५ लाख रुपयांच्या निविदा काढल्या आहेत. मात्र, गणेश विसर्जन २५ सप्टेंबरला असताना या निविदा २१ सप्टेंबरला उघडण्यात येणार आहेत. तसेच कक्षांचा कामाचा कालावधी २० दिवसांचा असल्याने या निविदांवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.**

महापालिकेने १२ सप्टेंबर रोजी यासंदर्भात जाहिरात प्रसिद्ध केली. प्रत्येकी २१ लाख १८ हजार ५०० रुपयांच्या पाच स्वतंत्र निविदा काढण्यात आल्या असून, त्या २१ सप्टेंबरला उघडण्यात येणार आहेत. या निविदांमुळे महापालिकेच्या निधीची उधळपट्टी होणार असल्याचा आक्षेप सजग नागरिक मंचाने घेतला आहे.

मंचाचे अध्यक्ष विवेक वेलणकर यांनी या निविदा रद्द करण्याची मागणी महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांच्याकडे केली आहे. गणेशोत्सवातील मुख्य विसर्जन मिरवणुकीच्या मार्गावर महापालिकेच्या तसेच विविध शैक्षणिक संस्थांच्या इमारती आणि वर्गखोल्या उपलब्ध आहेत. त्यामुळे नवीन कक्ष उभारण्याऐवजी या जागांचा वापर करता आला असता, असा दावा त्यांनी केला.

लक्ष्मी रस्ता, कुमठेकर रस्ता, टिळक रस्ता आणि केळकर रस्त्याच्या परिसरात विश्रामबाग क्षेत्रीय कार्यालय, कलावती मावळे दवाखाना, स. गो. बर्वे शाळा, हुजूरपागा शाळा, नू. म. वि. शाळा, गोखले सभागृह, ट्रेनिंग कॉलेज, हिराबाग क्षेत्रीय कार्यालय, स. प. महाविद्यालय आणि न्यू इंग्लिश स्कूलच्या वर्गखोल्या उपलब्ध असल्याचे वेलणकर यांनी सांगितले. शैक्षणिक संस्थांकडे विनंती केल्यास या जागा नाममात्र दरात किंवा मोफत उपलब्ध होऊ शकतात. त्यामुळे लाखो रुपये खर्च करून स्वतंत्र कक्ष उभारण्याची गरज काय, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

दरम्यान, अतिरिक्त महापालिका आयुक्त प्रजित नायर यांनी उपायुक्त पातळीवर या निविदा काढण्यात आल्याचे सांगत, याबाबत माहिती घेऊन योग्य निर्णय घेतला जाईल, असे स्पष्ट केले.

### नगरसेवकांकडून निधी

महापालिकेने काढलेल्या निविदांबाबत विश्रामबाग वाडा क्षेत्रीय कार्यालयातील भवन विभागाचे कनिष्ठ अभियंता कमलेश जाधव यांच्याशी संपर्क साधला असता ते म्हणाले, 'वैद्यकीय कक्ष आणि हिरकणी कक्षासाठी नगरसेवकांनी त्यांच्या निधीतून वर्गीकरद्वारे रक्कम उपलब्ध करून दिली आहे. त्यानुसार या निविदा काढल्या आहेत. वैद्यकीय कक्ष आणि हिरकणी कक्षासाठी महापालिकेने जागा निश्चित केल्या आहेत.'

### १ कोटी ५ लाखांचा खर्च

झोन क्रमांक ५ कडून प्रत्येकी २१ लाख १८ हजार ५०० रुपयांच्या पाच स्वतंत्र निविदा काढण्यात आल्या आहेत. या खर्चामुळे महापालिकेच्या निधीची उधळपट्टी होणार असल्याचा आक्षेप घेण्यात आला आहे.

### उपलब्ध जागांचा वापर शक्य

विसर्जन मिरवणुकीच्या मार्गावर महापालिका कार्यालये, दवाखाने, शाळा आणि महाविद्यालयांच्या वर्गखोल्या उपलब्ध आहेत. या जागा नाममात्र दरात किंवा मोफत मिळू शकतात, असा दावा करण्यात आला आहे.

# विकासकामांना गती देण्यासाठी आता ‘एमडी पॅटर्न’

## आमदार महेश लांडगे यांचे जिल्हाधिकारी, आयुक्तांना स्पष्ट निर्देश

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**जिल्हाधिकारी कार्यालय आणि महापालिका प्रशासनाकडे प्रलंबित असलेल्या विकासकामांना गती देण्यासाठी पिंपरी-चिंचवडमध्ये आता ‘एमडी पॅटर्न’ राबवण्यात येणार आहे. आमदार महेश लांडगे यांच्या पुढाकाराने झालेल्या बैठकीत भूसंपादन, जागा आरक्षण, जागा हस्तांतरण आणि प्रशासकीय मान्यतेअभावी रखडलेल्या सात प्रमुख विषयांचा आढावा घेण्यात आला. प्रत्येक कामासाठी नोडल अधिकारी, जबाबदार यंत्रणा आणि निश्चित कालमर्यादा ठरवून पुढील बैठकीत ‘ॲक्शन टेकन रिपोर्ट’ सादर करण्याचे निर्देश देण्यात आले.**

पुणे जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या बैठकीला जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी तसेच महसूल, भूसंपादन, भूमी अभिलेख, वन विभाग आणि महापालिकेचे अधिकारी उपस्थित होते.

भोसरी मतदारसंघातील महत्त्वाचे रस्ते, रस्त्यांचे रुंदीकरण आणि २२ ‘मिसिंग लिंक’ची कामे भूसंपादनाअभावी रखडली आहेत. प्रत्येक रस्त्याचे क्षेत्रफळ, सर्व्हे क्रमांक, बाधित जमीनमालक, मोबदला आणि भूसंपादनाचा सद्य टप्पा स्पष्ट करून संबंधित ठिकाणांची पाहणी २५ ऑक्टोबरपर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या महत्त्वाकांक्षी इंद्रायणी नदी सुधार प्रकल्पांतर्गत तळवडे ते चऱ्होली नदीकाठच्या प्रस्तावित रस्त्यासाठी स्वतंत्र नोडल अधिकारी नियुक्त करून भूसंपादनाचे वेळापत्रक तयार करण्यात येणार आहे.



### कार्यवाहीचा ‘ॲक्शन टेकन रिपोर्ट’

मोशी-डुडूळगाव येथील शासकीय गायरान जमिनीवर गोल्फ कोर्स आणि पिंपरी-चिंचवड स्पोर्ट्स क्लब विकसित करण्याच्या प्रस्तावासाठी जागेची संयुक्त पाहणी करून आरक्षणाची प्रक्रिया सुरू करण्याचे निर्देश देण्यात आले. मोशीतील प्रस्तावित IIM संस्थेच्या जागेच्या हस्तांतरणाची उर्वरित प्रशासकीय प्रक्रिया दोन दिवसांत पूर्ण करण्याचे निश्चित करण्यात आले. पद्मश्री गिरीश प्रभुणे यांच्या गुरुकुल संस्थेला प्रस्तावित जागेचा ताबा देण्याची कार्यवाही तातडीने करावी, तसेच डुडूळगाव येथील इको-टुरिझम प्रकल्पातील त्रुटी दूर करून सुधारित प्रस्ताव डिसेंबरअखेर शासनाकडे पाठवावा, असे निर्देश देण्यात आले. मतदारसंघातील तलाठी सजा कार्यालयांसाठी कायमस्वरूपी जागा निश्चित होईपर्यंत तात्पुरती कार्यालयीन व्यवस्था करण्याचेही ठरले. ‘एमडी पॅटर्न’ म्हणजे बैठक, निर्णय, जबाबदारी, कालमर्यादा आणि प्रत्यक्ष कार्यवाही. पुढील आढावा बैठकीपूर्वी सर्व विभागांना झालेल्या कार्यवाहीचा ‘ॲक्शन टेकन रिपोर्ट’ सादर करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

> “प्रलंबित विकासकामे केवळ कागदोपत्री न राहता निश्चित कालमर्यादित पूर्ण झाली पाहिजेत. प्रत्येक कामासाठी जबाबदार अधिकारी, नोडल यंत्रणा आणि वेळापत्रक निश्चित केले आहे. यापुढे प्रत्येक आढावा बैठकीत संबंधित विभागांना ‘ॲक्शन टेकन रिपोर्ट’ सादर करावा लागेल.”
>
> - महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

# पिंपरी-चिंचवड महापालिकेत मोठ्या प्रमाणावर पदोन्नत्या

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या अनेक कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्यात आली आहे. त्यात कार्यकारी अभियंता, उपअभियंता, कनिष्ठ अभियंता, कार्यालय अधीक्षक, लेखापाल, सहाय्यक आरोग्य अधिकारी, मुख्य आरोग्य निरीक्षक, सिस्टर इनचार्ज, असिस्टंट मेट्रन, मेट्रन, नर्स मिडवाईफ, आरेखक, सांख्यिकी, फिटर, विद्युत पर्यवेक्षक आदी पदावर सेवाज्येष्ठतेनुसार पदोन्नती देण्यात आली आहे. तसेच, अनेकांचे विभाग बदलण्यात आले आहेत. त्यास नुकतीच आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी अंतिम मान्यता दिली आहे.**

स्थापत्य विभागाचे उपअभियंता दीपक करपे, किरण अंदुरे, मनोज बोरसे, शेखर गुरव आणि चंद्रकांत मोरे या पाच जणांची कार्यकारी अभियंतापदी पदोन्नती करण्यात आली आहे. स्थापत्य विभागाचे कनिष्ठ अभियंता संजय लोखंडे, अनिल गडदे, विवेक ताकवाले, अमोल उंडे, तानाजी ढेकळे, संदीप ठोकळे, सचिन मगर, श्रीनिवास कोरेवार, प्रतीक भसारकर आणि चेतन देसले या दहा जणांची उपअभियंता पदावर पदोन्नती करण्यात आली आहे. अनुरेखक पुष्पराज भागवत यांची आरेखक पदावर पदोन्नती करण्यात आली आहे.

सांख्यिकी सहाय्यक सौरभ टेकवडे यांना सांख्यिकी पदावर पदोन्नती देण्यात आली आहे. उपलेखापाल शुभांगी चव्हाण,




विनोद झुंझुरके, प्रियांका रणसिंग, अश्विनी निगडे, रोजश सोलंकी, पल्लवी कुलकर्णी, संदीप पवार आणि गणेश कोमकर या आठ जणांची लेखापाल पदी पदोन्नती करण्यात आली आहे. मुख्य लिपिक विष्णू त्रिकोणे, रोहिदास शेटे, देवीदास कुंभार, रवींद्र शिंदे, प्रमिला गायकवाड, नीता राणे, राकेश सौदे, विशाल भोईर, शिवाजी खेडकर, नंदा ढेंगळे, उमेश बांदल असे अकरा जणांची कार्यालय अधिक्षक म्हणून पदोन्नती करण्यात आली आहे. एएनएम सियोना बनसोडे यांना नर्स मिडवाईफ या पदावर पदोन्नती देण्यात आली आहे. मुख्य आरोग्य निरीक्षक अतुल सोनवणे, योगेश फल्ले आणि कांचनकुमार इंदलकर यांची सहाय्यक आरोग्य अधिकारी पदी पदोन्नती करण्यात आली आहे. आरोग्य निरीक्षक सुशील मलैय व अमित पिसे या दोघांची मुख्य आरोग्य निरीक्षक म्हणून पदोन्नती झाली आहे.

स्टाफ नर्स असलेल्या रजनी भुजबळ, राजश्री मखामले, प्रतिभा टाकळकर, अंजली तेलगू, कल्याणी जगदाळे, हेमतला शेवकर, माधुरी जिड्डीमनी, कविता जाधव, स्नेहा परब, माधुरी पंदारे, विद्या खलाटे, उज्वला कोंद्रे, वनीता गावडे, भारती मानमोडे या चौदा जणांची सिस्टर इनचार्ज म्हणून पदोन्नती करण्यात आली आहे. असिस्टंट मेट्रन सुरेखा कापरे यांची मेट्रनपदी पदोन्नती करण्यात आली आहे. विद्युत पर्यवेक्षक लक्ष्मण इटकर आणि राघवेंद्र धर्मकांबळे या दोघांची विद्युत विभागात कनिष्ठ अभियंता म्हणून पदोन्नती करण्यात आली आहे. वीजतंत्री कुंदन ढोरे, नाना नरुटे, चंद्रकांत कोंढवळे, राहुल सावंत, विजय काळाणे, अमोल चव्हाण, कृष्णा पारगे, संदीप पाटील, रमेश राठोड, प्रवीण गाडेकर आणि सुनील कांबळे या अकरा जणांनी विद्युत पर्यवेक्षक म्हणून पदोन्नती करण्यात आली आहे. मेटेन्सस हेल्पर सुहास ताकवले यांची फिटर पदावर पदोन्नती केली आहे.

### कार्यकारी अभियंत्यांच्या बदल्या

कार्यकारी अभियंता या पदावरील अधिकाऱ्यांच्या अंतर्गत बदल्या करण्यात आल्या आहेत. वैशाल ननावरे यांची बदली स्थापत्य मुख्यालय, हरविंदरसिंग बन्सल यांची बदली अ क्षेत्रीय कार्यालय, विजय जाधव यांची बदली ग क्षेत्रीय कार्यालय, सुनील शिंदे यांची बदली ज क्षेत्रीय कार्यालय आणि हेमंत देसाई यांची बदली बांधकाम परवानगी विभागात करण्यात आली आहे. तर, पदोन्नतीने कार्यकारी अभियंता झालेले दीपक करपे यांच्याकडे ड क्षेत्रीय कार्यालय, किरण अंदुरे यांच्याकडे ल क्षेत्रीय कार्यालय, मनोज बोरसे यांच्याकडे स्थापत्य प्रकल्प, शेखर गुरव यांच्याकडे झोनिपू स्थापत्य आणि चंद्रकांत मोरे यांच्याकडे स्थापत्य मुख्यालय विभागात पदस्थापना देण्यात आली आहे.

# डोवाल-पुतिन भेटीचा अनोखा संकेत



## भूमिका

**ब्रिक्स शिखर परिषदेत रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांनी भारताचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांच्याकडे वळून केलेले हस्तसंकेत काही क्षणांचे असले, तरी त्यातून भारत-रशिया संबंधातील एका महत्त्वाच्या पैलूची झलक दिसली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे अभिवादन स्वीकारल्यानंतर पुतिन यांनी डोवाल यांच्याकडे पाहून हात हलवला.**



हा प्रसंग औपचारिक राजनैतिक शिष्टाचारापलीकडचा म्हणून चर्चेत आला. पुतिन आणि डोवाल या दोघांचीही पार्श्वभूमी राष्ट्रीय सुरक्षा आणि गुप्तचर क्षेत्राशी जोडलेली आहे. त्यामुळे संवेदनशील विषयांवरील संवाद, परस्पर विश्वास आणि रणनीतिक समज यांना त्यांच्या भेटींमध्ये विशेष महत्त्व असणे स्वाभाविक आहे. सप्टेंबर २०२६ मधील मोदी-पुतिन चर्चेतही राजकीय, आर्थिक, संरक्षण, ऊर्जा आणि अंतराळ क्षेत्रातील सहकार्याचा आढावा घेण्यात आला.

या एका प्रसंगातून मात्र भारताच्या परराष्ट्र धोरणाचा मोठा धडा घेता येतो. रशियाशी जुने संबंध कायम ठेवताना भारताने अमेरिका, युरोप, चीन आणि पश्चिम आशियातील बदलत्या समीकरणांशीही संवाद राखला आहे. म्हणूनच व्यक्तींच्या मैत्रीपेक्षा संस्थात्मक संबंध आणि राष्ट्रीय हित यांना अधिक महत्त्व आहे.दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त भाजपने ‘आशीर्वाद का दिया’ उपक्रमाचे आवाहन केले आहे. १७ सप्टेंबरला घरात दिवा लावण्याचे आवाहन करण्यात आले असून, सरकारी योजनांच्या लाभार्थ्यांचा सहभागही अपेक्षित आहे. याचबरोबर मोदींच्या सार्वजनिक जीवनातील २५ वर्षांच्या निमित्ताने ‘सेवा संकल्प अभियान’ महिनाभर राबवले जाणार आहे. राजकीय पक्षांसाठी अशा प्रतीकात्मक उपक्रमांचे महत्त्व असते; मात्र लोकशाहीत सरकारी योजनांचे लाभार्थी आणि पक्षीय कार्यक्रम यांच्यातील सीमारेषा स्पष्ट राहणे तितकेच महत्त्वाचे आहे.

जम्मू-काश्मीरमध्येही सध्या प्रशासकीय बदल चर्चेचा विषय ठरला आहे. नायब राज्यपाल मनोज सिन्हा रजेवर असताना लडाखचे नायब राज्यपाल विनय कुमार सक्सेना यांच्याकडे जम्मू-काश्मीरचा अतिरिक्त कार्यभार सोपवण्यात आला आहे. राष्ट्रपती भवनाच्या अधिकृत निवेदनात ही नियुक्ती स्पष्ट करण्यात आली आहे. यापुढील राजकीय बदलांविषयी विविध चर्चा असल्या, तरी त्या अधिकृत निर्णय होईपर्यंत तर्क म्हणूनच पाहणे योग्य ठरेल.

निवडणूक राजकारणातही पोटनिवडणुका महत्त्वाच्या ठरतात. आसाममधील नागाव लोकसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीची प्रक्रिया सुरू झाली असून ६ ऑक्टोबरला मतदान होणार आहे. या निवडणुकीकडे केवळ एका जागेची लढत म्हणून नव्हे, तर संबंधित राज्यातील बदलत्या राजकीय समीकरणांच्या संदर्भात पाहिले जाईल. पुतिन यांचा डोवालांकडे केलेला हातवारा असो किंवा दिव्यांच्या माध्यमातून व्यक्त होणारे राजकीय संदेश—प्रतीकांना अर्थ असतो; पण त्या प्रतीकांपेक्षा धोरण, निर्णय आणि त्यांच्या परिणामांचे मूल्यमापन अधिक महत्त्वाचे. भारतीय लोकशाहीची खरी ताकद याच विवेकपूर्ण चर्चेत आहे.

## प्रासंगिक »

# हरवलेली घंटा

**एका गावातील मंदिराची जुनी घंटा एके दिवशी अचानक गायब झाली. गावकऱ्यांनी खूप शोध घेतला, पण घंटा सापडली नाही. सगळे एकमेकांवर संशय घेऊ लागले. गावातील विठ्ठल नावाचा मुलगा मात्र शांतपणे मंदिराभोवती पाहत होता.**

त्याला मंदिराच्या मागे जमिनीवर काही ताज्या पावलांच्या खुणा दिसल्या. त्या खुणांचा मागोवा घेत तो जंगलाच्या दिशेने गेला. थोडे पुढे गेल्यावर त्याला काटेरी झुडपात घंटा अडकलेली दिसली. जोरदार वाऱ्यामुळे घंटा मंदिराच्या मनोऱ्यातून खाली पडून घसरत जंगलात गेली होती.


विठ्ठलने ती घंटा गावकऱ्यांना आणून दिली. सगळ्यांना आपली चूक समजली. संशय घेण्यापेक्षा शांतपणे विचार करून सत्य शोधणे अधिक योग्य आहे, हे गावकऱ्यांनी मान्य केले.

त्या दिवसापासून गावात कोणतीही अडचण आली की लोक आधी शांतपणे विचार करू लागले आणि मग निर्णय घेऊ लागले.”

- तात्पर्य : घाईचा संशय चुकीचा ठरू शकतो; सत्य शोधण्यासाठी संयम आवश्यक आहे.

कृत्रिम बुद्धिमत्तेच्या क्षेत्रात सध्या वेगाची अभूतपूर्व स्पर्धा सुरू आहे. ओपनएआय, गुगल, अँथ्रॉपिक यांसारख्या आघाडीच्या कंपन्या अधिक सक्षम एआय प्रणाली विकसित करण्यासाठी प्रचंड गुंतवणूक करीत आहेत.

# एआयच्या महाशर्यतीत माणूस कुठे?



या स्पर्धेच्या केंद्रस्थानी आहे ‘एजीआय’ अर्थात आर्टिफिशियल जनरल इंटेलिजन्स. आजच्या विशिष्ट कामांपुरत्या मर्यादित एआयपेक्षा एजीआय मानवी पातळीवर विविध प्रकारची कामे शिकू, समजू आणि तर्कशुद्धपणे हाताळू शकेल, अशी संकल्पना आहे.

एजीआय विकसित करणाऱ्याला विज्ञान, औषधनिर्मिती, उद्योग, अर्थव्यवस्था आणि संरक्षण अशा अनेक क्षेत्रांत मोठी आघाडी मिळू शकते. त्यामुळेच ‘पहिले कोण?’ हा प्रश्न कंपन्यांपुरता राहिलेला नाही. त्याला राष्ट्रीय सुरक्षेचे आणि भू-राजकीय महत्त्व प्राप्त झाले आहे. परिणामी, सुरक्षिततेचे नियम, नैतिक प्रश्न आणि तंत्रज्ञानाच्या संभाव्य दुष्परिणामांपेक्षा वेगाला अधिक महत्त्व मिळण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

यातील सर्वांत गंभीर प्रश्न म्हणजे एआय स्वतःमध्ये सुधारणा करू लागल्यास काय होईल? एखादी प्रणाली मानवी क्षमतेच्या पुढे गेल्यानंतर तिच्यावर नियंत्रण ठेवणे कितपत शक्य राहील, हा अद्याप निश्चित उत्तर नसलेला प्रश्न आहे. स्व-सुधारणेची क्षमता, स्वायत्त निर्णय आणि प्रचंड संगणकीय संसाधनांचा संगम झाला, तर मानवी नियंत्रणासमोर नवे आव्हान उभे राहू शकते. मात्र, एजीआयच्या अशा क्षमतांविषयी केलेले अनेक अंदाज अद्याप निश्चित वास्तव नसून संशोधन आणि तज्ज्ञांच्या चर्चेचा विषय आहेत.

या स्पर्धेची तुलना अण्वस्त्रांच्या शर्यतीशी केली जाते. शीतयुद्धाच्या काळात प्रतिस्पर्धी देश आधी शस्त्रसज्ज होईल या भीतीने दोन्ही बाजूंनी आपली शस्त्रसामग्री वाढवली. एआयमध्येही ‘आपण थांबलो तर दुसरा पुढे जाईल’ अशी मानसिकता निर्माण झाली, तर सुरक्षिततेचे प्रयत्न मागे पडू शकतात.

म्हणून एआयचा विकास थांबवणे हा उपाय नसला, तरी त्याचा वेग आणि सुरक्षितता यांच्यात संतुलन राखणे अत्यावश्यक आहे. कंपन्यांमधील स्पर्धेबरोबरच सरकारे, शास्त्रज्ञ आणि आंतरराष्ट्रीय संस्था यांनीही स्पष्ट नियम, पारदर्शकता आणि जबाबदारीची चौकट उभी करणे गरजेचे आहे. एआय मानवासाठी साधन ठरावे की मानवाच्या नियंत्रणापलीकडचे आव्हान, याचे उत्तर केवळ तंत्रज्ञान देणार नाही; ते ठरवणारे मानवी निर्णयच असतील.

## ।। अभंगवाणी ।।



संवसारतापें तापलों मी देवा ।
करितां या सेवा कुटुंबाची ॥१॥

म्हणऊनी तुझे आठविले पाय ।
ये वो माझे माय पांडुरंगे ॥ध्रु.॥

- संत तुकाराम


**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# जगप्रसिद्ध ‘लोणार सरोवरा’चे अस्तित्व धोक्यात

## जंगलाचा अधिवास आणि वैशिष्ट्यपूर्ण जैवविविधतेवरही संकट

महाईन्यूज | नागपूर

**जगप्रसिद्ध लोणार सरोवराची पाणीपातळी सातत्याने वाढत असल्याने सरोवराच्या ऐतिहासिक आणि पर्यावरणीय वारशावर संकट निर्माण झाले आहे. कमळजा माता मंदिरासह परिसरातील काही प्राचीन मंदिरे पाण्याखाली गेली असून, जंगलाचा अधिवास आणि लोणारची वैशिष्ट्यपूर्ण अल्कधर्मी परिसंस्थाही धोक्यात आली आहे.**





पाणीपातळी आणखी वाढल्यास सरोवरालगतचा जंगलाचा अधिवास कमी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे कोल्हे, तडस, साळींदर, बिबटे यांसह वन्यजीव मानवी वस्त्यांकडे वळण्याचा धोका वाढला आहे. परिणामी मानव-वन्यजीव संघर्षाची परिस्थिती निर्माण होऊ शकते.

सरोवरातील पाण्याचा पीएच स्तर आणि क्षारांचे प्रमाण बदलल्याने अल्कधर्मी परिसंस्थेवर परिणाम होत असल्याचे सांगण्यात येते. सरोवरात माशांची संख्या वाढल्याने मासे खाणारे पक्षीही वाढत असून, त्यामुळे लोणारची मूळ जैवविविधता बदलण्याची भीती व्यक्त होत आहे.

मागील वर्षी सरोवरातील पाणी कमी करण्यासाठी एका वर्षात उपाययोजना करण्याचे आश्वासन देण्यात आले होते. गोड्या पाण्याचे झरे एका ठिकाणी केंद्रित करून पंपाद्वारे पाणी बाहेर काढण्याचा प्रस्ताव होता. मात्र, वर्ष उलटूनही प्रत्यक्ष काम सुरू झालेले नाही. शेतीचे अधिग्रहण झाल्यानंतर झऱ्यांचे पाणी थेट सरोवरात येत असल्याने पाणीपातळी वाढत असल्याचे सांगितले जाते.

वाढत्या पाणीपातळीची उच्च न्यायालयाने दखल घेत तज्ज्ञ समिती नेमली आहे. समितीने प्राथमिक मत मांडले असले तरी केंद्रीय वन्यजीव मंडळाच्या मंजुरीअभावी पाणी काढण्याचे काम रखडले आहे. संबंधित विभागाने त्रुटी दूर करून प्रस्ताव पुन्हा सादर केला असून, मंजुरीची प्रतीक्षा आहे.

लोणारला अभयारण्याचा दर्जा असून, उल्कापातामुळे निर्माण झालेल्या या सरोवराला विशेष पर्यावरणीय महत्त्व आहे. त्यामुळे वाढती पाणीपातळी नियंत्रित करून मंदिरे, जंगलाचा अधिवास आणि जैवविविधता वाचविण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्याची मागणी होत आहे.

‘मी लोणारकर’ समूहाचे सचिन कापुरे यांनी परवानग्यांच्या प्रक्रियेत वेळ न दवडता तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. विभागीय वनाधिकारी यशवंत नागुलवार यांनी केंद्रीय वन्यजीव मंडळाची परवानगी मिळाल्यानंतर गोडे पाणी बाहेर काढता येईल, असे सांगितले. भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभागाचे शिवकुमार भगत यांनी मंदिरांचा विषय न्यायालयीन प्रक्रियेत असल्याने तज्ज्ञ समितीच्या निर्णयाची प्रतीक्षा असल्याचे स्पष्ट केले.

### पाणी काढण्याची योजना रखडली

सरोवरातील वाढती पाणीपातळी कमी करण्यासाठी मागील वर्षी संबंधित विभागाने एका वर्षात उपाययोजना करण्याचे आश्वासन दिले होते. गोड्या पाण्याचे झरे एका ठिकाणी केंद्रित करून पंपाद्वारे पाणी बाहेर काढण्याचा प्रस्ताव होता. मात्र, वर्ष उलटूनही प्रत्यक्ष काम सुरू झालेले नाही.

# मातृत्वाचा सन्मान; एसटी बसस्थानकांवर १२५ ‘हिरकणी कक्ष’



महाईन्यूज | मुंबई

**महिला प्रवाशांच्या सुरक्षितता आणि सुविधांच्या दृष्टीने महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. एसटी महामंडळ आणि टोयोटा किर्लोस्कर मोटर प्रायव्हेट लिमिटेड यांच्यात राज्यातील बसस्थानकांवर १२५ ‘हिरकणी कक्ष’ उभारण्यासाठी सामंजस्य करार करण्यात आला.**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत हा करार झाला. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार आणि परिवहन मंत्री प्रताप सरनाईक उपस्थित होते.

स्तनदा मातांना प्रवासादरम्यान बाळाला स्तनपान देण्यासाठी तसेच बाळाची निगा राखण्यासाठी स्वच्छ, सुरक्षित आणि खासगी जागा उपलब्ध करून देणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे. टोयोटा किर्लोस्करच्या CSR निधीतून अंदाजे ३ बाय ३ मीटर आकाराचे प्री-फॅब्रिकेटेड कक्ष उभारले जाणार आहेत. त्यामध्ये आवश्यक फर्निचर, विद्युतीकरण आणि इलेक्ट्रॉनिक साहित्याची सुविधा असेल. २०२६-२७ मध्ये ५०, २०२७-२८ मध्ये ५० आणि २०२८-२९ मध्ये २५ कक्ष उभारण्याचे नियोजन आहे. उपलब्ध जागा आणि स्थानिक गरजेनुसार संख्येत बदल करण्याची तरतूदही करारात करण्यात आली आहे.

### तीन वर्षांत १२५ ‘हिरकणी कक्ष’

राज्यातील विविध एसटी बसस्थानकांवर तीन वर्षांच्या कालावधीत एकूण १२५ ‘हिरकणी कक्ष’ उभारण्यात येणार आहेत. २०२६-२७ मध्ये ५०, २०२७-२८ मध्ये ५० आणि २०२८-२९ मध्ये २५ कक्ष उभारण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

कक्ष उभारण्यासाठी एसटी महामंडळाकडून सुमारे ५ बाय ५ मीटर जागा उपलब्ध करून दिली जाणार आहे. तसेच वीज, पाणी, स्थापनेसाठी सहकार्य आणि आवश्यक परवानग्या मिळविण्याची जबाबदारी एसटीची राहणार आहे. कक्ष पूर्ण झाल्यानंतर त्यांचे संचालन, सुरक्षा, दुरुस्ती आणि देखभालही एसटीकडून केली जाणार आहे.

या प्रकल्पासाठी एसटी महामंडळाकडून कोणतेही आर्थिक योगदान दिले जाणार नसून, संपूर्ण प्रकल्प टोयोटा किर्लोस्करच्या CSR निधीतून राबविला जाणार आहे. महिला प्रवाशांच्या गरजा लक्षात घेऊन ‘हिरकणी कक्ष’ हा संवेदनशील आणि सुविधाकेंद्रित उपक्रम ठरणार असल्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले.

### टोयोटाच्या CSR निधीतून प्रकल्प

‘हिरकणी कक्ष’ उभारणीचा संपूर्ण खर्च टोयोटा किर्लोस्कर मोटरच्या CSR निधीतून केला जाणार आहे. या प्रकल्पासाठी एसटी महामंडळाकडून कोणतेही आर्थिक योगदान दिले जाणार नसल्याने महामंडळावर अतिरिक्त आर्थिक भार पडणार नाही.

# पाच राज्यांच्या रणसंग्रामाची तयारी

## वरिष्ठ अधिकाऱ्यांचे पथक राज्यांचा दौरा करणार; निवडणूक आयोग मैदानात!

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**उत्तर प्रदेश, पंजाब, मणिपूर, गोवा आणि उत्तराखंड या पाच राज्यांतील २०२७च्या विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय निवडणूक आयोगाने तयारीला वेग दिला आहे. आयोगाचे वरिष्ठ अधिकाऱ्यांचे पथक या राज्यांचा दौरा करून निवडणूक तयारीचा आढावा घेणार आहे. निवडणुकीच्या अधिकृत तारखा मात्र अद्याप जाहीर झालेल्या नाहीत.**




चार अधिकाऱ्यांचे पथक प्रत्येक राज्यातील मुख्य निवडणूक अधिकारी, जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक आणि अन्य विभागांच्या अधिकाऱ्यांसोबत बैठका घेणार आहे. कायदा-सुव्यवस्था, संवेदनशील व अतिसंवेदनशील मतदान केंद्रे, ईव्हीएम-व्हीव्हीपॅटची उपलब्धता तसेच निवडणुकीसाठी आवश्यक पोलीस दलाचा आढावा घेतला जाणार आहे.

राज्य प्रशासनाकडून निवडणूक आयोगासमोर तयारीचे सादरीकरण केले जाईल. या पथकाचा अहवाल मिळाल्यानंतर मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार आणि अन्य निवडणूक आयुक्त संबंधित राज्यांचा दौरा करणार आहेत. त्यानंतर निवडणुकीचे वेळापत्रक आणि मतदानाचे टप्पे निश्चित केले जाण्याची शक्यता आहे.

उत्तर प्रदेशमध्ये विधानसभेच्या ४०३ जागा असल्याने येथे मतदानासाठी अनेक टप्पे लागू शकतात. मणिपूरमध्येही कायदा-सुव्यवस्था आणि उपलब्ध सुरक्षा दलाच्या आधारे मतदानाचे टप्पे निश्चित केले जातील. पंजाब, उत्तराखंड आणि गोवा येथे तुलनेने कमी टप्प्यांत मतदान होण्याची शक्यता व्यक्त केली जात असली, तरी अंतिम निर्णय आयोगच घेणार आहे. तयारीला वेग पाचही राज्यांतील निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मतदान केंद्रे, ईव्हीएम-व्हीव्हीपॅट, सुरक्षा व्यवस्था आणि मनुष्यबळाची उपलब्धता तपासली जाणार आहे. आयोगाच्या प्रत्यक्ष पाहणीनंतर निवडणुकीच्या पुढील प्रक्रियेला वेग येणार आहे.

### कोणत्या राज्यांत किती टप्प्यांत निवडणुका होणार?


या माहितीचा आढावा घेतल्यानंतर मुख्य निवडणूक आयुक्त आणि दोन्ही निवडणूक आयुक्त पाच राज्यांचा दौरा करतील. त्यानंतर निवडणुकीच्या तारखा आणि टप्पे जाहीर केले जातील. उत्तर प्रदेश आणि मणिपूर वगळता पंजाब, उत्तराखंड आणि गोवा येथे निवडणुका एकाच टप्प्यात घेण्यात येतील. उत्तर प्रदेशमधील विधानसभा निवडणुका दोन किंवा तीन टप्प्यांत घेतल्या जाऊ शकता. या पाच राज्यांमध्ये उत्तर प्रदेशमध्ये सर्वाधिक ४०३ विधानसभा जागा आहेत.

# अरबी समुद्रात भारतीय-पाकिस्तानी युद्धनौकांची धडक



**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**उत्तर अरबी समुद्रातील आंतरराष्ट्रीय पाण्यात पाकिस्तानच्या नौदलाच्या जहाजाची भारतीय नौदलाच्या युद्धनौकेला धडक झाल्याची घटना १५ सप्टेंबरच्या संध्याकाळी घडली. पाकिस्तानी जहाजाच्या धोकादायक हालचालींमुळे ही घटना घडल्याचे भारतीय अधिकाऱ्यांनी सांगितले. या धडकेत भारतीय युद्धनौकेचे मोठे नुकसान झाले नसून सर्व जवान सुरक्षित असल्याचे स्पष्ट करण्यात आले.**



घटनेनंतर भारताने राजनैतिक पातळीवर कठोर भूमिका घेतली. नवी दिल्लीतील पाकिस्तानच्या उच्चायोगातील 'चार्ज द अफेअर्स' यांना परराष्ट्र मंत्रालयात पाचारण करून घटनेबाबत तीव्र निषेध नोंदविण्यात आला. भविष्यात अशा घटनांची पुनरावृत्ती होऊ नये आणि सागरी सुरक्षेचे नियम पाळावेत, असे भारताने स्पष्ट केले. भारताच्या म्हणण्यानुसार, पाकिस्तानी नौदलाच्या जहाजाची हालचाल १९९१च्या भारत-पाकिस्तान करारातील तरतुदींशी विसंगत होती. या करारानुसार लष्करी सराव आणि संबंधित हालचालींबाबत दोन्ही देशांनी आवश्यक पूर्वसूचना देणे अपेक्षित आहे. भारताने पाकिस्तानी नौदलाची ही कृती 'अव्यावसायिक आणि अस्वीकारार्ह' असल्याचे म्हटले आहे.

दरम्यान, इस्लामाबादमधील भारतीय उच्चायुक्तालयालाही पाकिस्तानच्या परराष्ट्र मंत्रालयाकडे या घटनेबाबत निषेध नोंदविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. समुद्रातील लष्करी हालचाली करताना सुरक्षा नियम आणि द्विपक्षीय करारांचे पालन करण्याचा संदेश भारताने दिला आहे.

मोठी दुर्घटना टळली भारतीय आणि पाकिस्तानी युद्धनौकांमध्ये धडक झाली असली तरी भारतीय युद्धनौकेचे मोठे नुकसान झालेले नाही. या घटनेत भारतीय नौदलाचे सर्व जवान सुरक्षित असल्याचे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

### भारताने नाराजी का व्यक्त केली?

या घटनेत मोठ्या नुकसानीचे वृत्त नाही, परंतु हे प्रकरण गंभीर आहे कारण भारत आणि पाकिस्तान यांच्यात आंतरराष्ट्रीय सागरी हद्दीत दोन्ही देशांच्या युद्धनौकांचे सुरक्षित अंतर आणि संचालन याबाबत आधीच एक करार आहे. भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने बुधवारी नवी दिल्लीतील पाकिस्तान उच्चायुक्तालयाच्या प्रभारी राजदूतांना बोलावून पाकिस्तानी नौदल तुकड्यांचे वर्तन अस्वीकार्य आणि अव्यावसायिक असल्याचे सांगत निषेध नोंदवला.

# TOXIC होणार या OTT वर रिलीज




दाक्षिणात्य सुपरस्टार यशचा बहुचर्चित चित्रपट 'टॉक्सिक: ए फेयरीटेल फॉर ग्रोन-अप्स' चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित झाल्यानंतर अवघ्या काही आठवड्यांतच ओटीटी प्लॅटफॉर्मवर दाखल होण्याची शक्यता आहे. थिएटरमधील कमाई आणि शोच्या संख्येत झालेली मोठी घट पाहता, निर्मात्यांनी हा चित्रपट मुदतीआधीच डिजिटल प्लॅटफॉर्मवर आणण्याचा विचार सुरू केल्याचे समजते. 'केजीएफ'च्या ऐतिहासिक यशानंतर यश मोठ्या पडद्यावर परतत असल्याने या चित्रपटाकडून प्रेक्षकांना खूप अपेक्षा होत्या. गीतू मोहनदास दिग्दर्शित या चित्रपटाची कथा जुन्या काळातील गोव्याची पार्श्वभूमी आणि तिथल्या ग्लॅमरस जगामागे सक्रिय असलेल्या एका शक्तिशाली ड्रग्ज कार्टेलवर आधारित आहे. मात्र, प्रदर्शनानंतर चित्रपटाच्या कथेवर प्रेक्षक आणि समीक्षकांनी तीव्र आक्षेप नोंदवले. सोशल मीडियावर मिळालेल्या प्रचंड नकारात्मक प्रतिक्रियांमुळे प्रेक्षकांनी थिएटरकडे पाठ फिरवली आणि चित्रपटाचे मोठे व्यावसायिक नुकसान झाले. चित्रपटाने पहिल्या आठवड्यात २३९.३० कोटी रुपयांची दमदार कमाई करत शानदार सुरुवात केली होती. परंतु, दुसऱ्याच आठवड्यात कमाईचा आलेख झपाट्याने घसरून केवळ ८.९४ कोटी रुपयांवर आला. आठवडाभरात कमाईत झालेली ही घसरण तब्बल ९५ टक्क्यांहून अधिक आहे. प्रेक्षकांच्या घटत्या संख्येचा थेट फटका शोच्या प्रमाणावरही बसला. पहिल्या दिवशी देशभरात २४,५७९ शोसह प्रदर्शित झालेल्या या चित्रपटाचे शो २१ व्या दिवसापर्यंत थेट २४८ वर आले, म्हणजेच सुरुवातीच्या तुलनेत शोच्या संख्येत ९९ टक्क्यांची प्रचंड घट नोंदवली गेली. '१२३ तेलुगू'च्या वृत्तानुसार, हा चित्रपट २५ सप्टेंबर रोजी ZEE5 या ओटीटी प्लॅटफॉर्मवर प्रीमियर होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. यामुळे ज्या प्रेक्षकांना हा चित्रपट थिएटरमध्ये पाहता आला नाही, त्यांना तो घरबसल्या पाहण्याची संधी मिळेल.



# बाप्पाच्या भक्तीत रमली रिंकू

गणेशोत्सवाचा उत्साह सध्या सर्वत्र पाहायला मिळत आहे. सामान्यांपासून सेलिब्रिटींपर्यंत प्रत्येकजण आपल्या लाडक्या बाप्पाच्या स्वागतामध्ये मग्न झाला आहे. अनेक कलाकार सोशल मीडियावर गणपती बाप्पासोबतचे खास फोटो आणि व्हिडीओ शेअर करत आहेत. मराठी अभिनेत्री रिंकू राजगुरूनेही बाप्पासोबतचे काही खास फोटो चाहत्यांसोबत शेअर केले आहेत. तिच्या या फोटोंनी सोशल मीडियावर चाहत्यांचं लक्ष वेधून घेतलं आहे. 'सैराट' चित्रपटातून घराघरात पोहोचलेली अभिनेत्री रिंकू राजगुरु तिच्या अभिनयासोबतच सोशल मीडिया पोस्टमुळेही चर्चेत असते.



# आमचं लग्न परफेक्ट नाही

दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय जोडी म्हणजे अभिनेता सूर्या आणि अभिनेत्री ज्योतिका. दोघांची ऑनस्क्रीन जोडी प्रेक्षकांना आवडलीच, पण त्यांची ऑफस्क्रीन केमिस्ट्रीही कायम चर्चेत असते. लग्नाला तब्बल 20 वर्ष पूर्ण झाल्यानंतरही दोघांमधील प्रेम आणि एकमेकांबद्दलचा आदर चाहत्यांचं लक्ष वेधून घेतो. आता त्यांच्या लग्नाच्या 20 व्या वाढदिवसानिमित्त दोघांनी पुन्हा एकदा लग्नाच्या शपथा घेतल्या आहेत. या खास सोहळ्याचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. सूर्या आणि ज्योतिका यांनी आपल्या लग्नाचा 20 वा वाढदिवस खास पद्धतीने साजरा केला. यासाठी चर्चमध्ये एका छोटेखानी सोहळ्याचं आयोजन करण्यात आलं होतं. या सोहळ्याला कुटुंबातील काही जवळचे सदस्य आणि मित्रमंडळी उपस्थित होती. या खास प्रसंगी ज्योतिका पांढऱ्या रंगाच्या सुंदर ब्रायडल गाऊनमध्ये दिसली. तर सूर्या पांढऱ्या रंगाच्या सूट जॅकेटमध्ये आणि काळ्या ट्राउझरमध्ये दिसत होता. ज्योतिका चर्चमध्ये येताच सूर्या भावुक झाल्याचं व्हिडीओमध्ये पाहायला मिळत आहे. ज्योतिका समोर येत असताना त्याच्या डोळ्यांत आनंदाश्रू तरळले. हा भावुक क्षण पाहून उपस्थितांनाही भावना अनावर झाल्या. सूर्या यांचा भाऊ आणि अभिनेता कार्तीही या सोहळ्यात उपस्थित होता. भावुक झालेल्या सूर्या यांना कार्तीने आधार दिल्याचंही व्हिडीओमध्ये दिसत आहे. या खास सोहळ्यात सूर्या आणि ज्योतिकाने एकमेकांना अंगठ्या घातल्या. तसेच पुन्हा एकदा आयुष्यभर एकमेकांची साथ देण्याचं वचन दिलं.

# विंडिजविरुद्धच्या मालिकेसाठी भारतीय संघ जाहीर!

## रोहित-विराट, वैभव सूर्यवंशी संघात; हार्दिक-पंतला डच्चू; २७ सप्टेंबरपासून तीन वन-डे

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**वेस्ट इंडिजविरुद्ध मायदेशात होणाऱ्या मर्यादित षटकांच्या मालिकेसाठी भारतीय संघाची अधिकृत घोषणा करण्यात आली आहे. निवड समितीने एकदिवसीय (ODI) आणि आंतरराष्ट्रीय टी-२० अशा दोन्ही मालिकांसाठी वेगवेगळे संघ जाहीर केले आहेत. एकदिवसीय मालिकेसाठी शुभमन गिलकडे कर्णधारपदाची धुरा सोपवण्यात आली असून, ज्येष्ठ फलंदाज रोहित शर्मा आणि विराट कोहली यांचाही या संघात समावेश करण्यात आला आहे.**




वन-डे मालिकेसाठी भारतीय संघात पंजाबचा युवा अष्टपैलू खेळाडू नमन धीर आणि जम्मू-काश्मीरचा वेगवान गोलंदाज आकिब नबी यांना प्रथमच संधी देण्यात आली, तर अनुभवी हार्दिक पंड्या आणि ऋषभ पंत यांना वेगवेगळ्या कारणांमुळे संघातून वगळण्यात आले आहे. भारत-वेस्ट इंडिज यांच्यात २७ सप्टेंबरपासून तिरुवनंतपूरम येथे तीन वन-डे आणि पाच टी-२० सामन्यांची मालिका खेळवली जाणार आहे.

दुसरीकडे, टी-२० संघाचे नेतृत्व श्रेयस अय्यरकडे सोपवण्यात आले असून युवा फलंदाज वैभव सूर्यवंशी याला संघात संधी मिळाली आहे; तर तिलक वर्मा याच्यावर उपकर्णधारपदाची जबाबदारी देण्यात आली आहे. याशिवाय, निवड समितीने रणजी विजेत्या जम्मू-काश्मीर संघाविरुद्ध होणाऱ्या प्रतिष्ठित इराणी कप लढतीसाठी 'रेस्ट ऑफ इंडिया' संघाचीही निवड केली आहे.

एकदिवसीय संघात शुभमन गिल कर्णधार, तर केएल राहुल उपकर्णधार आणि यष्टीरक्षकाच्या दुहेरी भूमिकेत दिसेल. या संघात अनुभवी रोहित शर्मा आणि विराट कोहली यांच्या उपस्थितीमुळे फलंदाजीला मोठा आधार मिळणार आहे. याव्यतिरिक्त ऋतुराज गायकवाड, यशस्वी जयस्वाल आणि नमन धीर यांना फलंदाजीत संधी देण्यात आली असून, ध्रुव जुरेलची यष्टीरक्षक म्हणून निवड झाली आहे.

अष्टपैलू खेळाडूंच्या श्रेणीत नितीश कुमार रेड्डी आणि रवींद्र जडेजा यांचा समावेश आहे. गोलंदाजीची मदार कुलदीप यादव, प्रसिद्ध कृष्णा, मोहम्मद सिराज, आकिब नबी आणि गुरनूर ब्रार यांच्या खांद्यावर असेल. अष्टपैलू हार्दिक पंड्याच्या पुनरागमनाला विलंब होत असल्याने नितीश कुमार रेड्डी याला आधी जाहीर केलेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेच्या संघातून वगळून थेट एकदिवसीय संघात पाचारण करण्यात आले आहे.

दुसरीकडे, भारताच्या टी-२० संघात फारसे मोठे फेरबदल करण्यात आलेले नाहीत. मात्र, वेगवान गोलंदाज मयांक यादव आणि प्रिन्स यादव यांनी संघात पुनरागमन करत आपली जागा पक्की केली आहे.

### वेस्ट इंडिजच्या भारत दौऱ्याचे संपूर्ण वेळापत्रक

एकदिवसीय मालिकेतील पहिला सामना २७ सप्टेंबर रोजी तिरुवनंतपुरम येथे खेळवला जाईल, तर दुसरा सामना ३० सप्टेंबर रोजी गुवाहाटी आणि तिसरा अंतिम सामना ३ ऑक्टोबर रोजी न्यू चंदिगढ येथे होणार आहे. त्यानंतर उभय संघांमध्ये पाच सामन्यांची टी-२० मालिका रंगणार आहे. या मालिकेतील पहिला सामना ६ ऑक्टोबर रोजी लखनौ, दुसरा सामना ९ ऑक्टोबर रोजी रांची, तिसरा सामना ११ ऑक्टोबर रोजी इंदूर, चौथा सामना १४ ऑक्टोबर रोजी हैदराबाद आणि पाचवा व अखेरचा टी-२० सामना १६ ऑक्टोबर रोजी बंगळुरू येथे खेळवला जाईल.

# आयपीएल २०२७ चा लिलाव भारतात होणार; इम्पॅक्ट प्लेअर' नियमावरही बीसीसीआयचा पुनर्विचार

**महाईन्यूज । मुंबई**

**आयपीएल २०२७ चा खेळाडूंचा लिलाव यंदा भारतातच आयोजित केला जाण्याची दाट शक्यता आहे. लीगचे अध्यक्ष अरुण धुमाळ यांनी गेल्या तीन वर्षांपासून परदेशात होणारा हा कार्यक्रम यंदा भारतात आणण्यासंदर्भात उत्सुकता दर्शवली आहे.**



गेल्या तीन आवृत्तींचे लिलाव दुबई, जेद्दा (मेगा लिलाव) आणि अबू धाबी येथे पार पडले होते. याविषयी बोलताना अरुण धुमाळ म्हणाले, "दरवर्षी आम्ही भारतात लिलाव घेण्याचा प्रयत्न करतो, मात्र लग्नसराईच्या दाट हंगामामुळे आम्हाला योग्य ठिकाण (वेन्यू) मिळण्यात अडचण येते. यंदा हा छोटा लिलाव (मिनी ऑक्शन) असल्यामुळे आम्हाला नक्कीच योग्य ठिकाण मिळेल आणि लिलाव भारतातच होईल, अशी आशा आहे." दरम्यान, बीसीसीआयच्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये धुमाळ यांची आयपीएल अध्यक्षपदी फेरनिवड होणे अपेक्षित असून, लिलावाचे यजमान शहर बीसीसीआयच्या पसंतीच्या ठिकाणाच्या उपलब्धतेवर ठरवले जाईल.

आगामी हंगामापूर्वी बहुतांश कर्णधारांनी या नियमाबाबत आपली नाराजी व्यक्त केली असून, तो रद्द करण्याची मागणी जोर धरत आहे. यावर प्रतिक्रिया देताना, बीसीसीआय या नियमाचा पुनर्विचार करण्यास तयार असल्याचे धुमाळ यांनी स्पष्ट केले असून सर्व संलग्न घटकांचा अभिप्राय घेऊन अंतिम निर्णय घेतला जाईल, असे त्यांनी नमूद केले. बीसीसीआयच्या या आगामी बैठकीत अरुण धुमाळ यांच्यासह खैरुल मजुमदार यांचीही आयपीएल गव्हर्निंग कौन्सिलवर फेरनिवड होणार आहे.

### 'इम्पॅक्ट प्लेअर' नियमावर फेरविचार

नुकत्याच झालेल्या गव्हर्निंग कौन्सिलच्या बैठकीत २०२७ पर्यंत लागू असणाऱ्या 'इम्पॅक्ट प्लेअर' नियमावरही सखोल चर्चा करण्यात आली. बीसीसीआयने या नियमावर सर्व संघांकडून नवीन अभिप्राय मागवले आहेत. हा रणनीतिक नियम संघांना सामन्याच्या कोणत्याही टप्प्यावर खेळाडू बदलण्याची (सबस्टिट्यूट) मुभा देतो.मात्र, या नियमामुळे अष्टपैलू खेळाडूंच्या भूमिकेला आणि कौशल्याला मर्यादा पडत असल्याचा आक्षेप अनेक दिग्गज खेळाडूंनी घेतला आहे. या खेळाडूंमध्ये भारताचे वन डे आणि कसोटी कर्णधार शुभमन गिल, माजी कर्णधार रोहित शर्मा, स्टार अष्टपैलू हार्दिक पंड्या आणि अक्षर पटेल यांचा समावेश आहे.



स्मार्ट PCMC
SMART CITY
epaper.mahaenews.com

महाईन्यूज™

ePaper
। गुरुवार ।
दि. 17 सप्टेंबर 2026 ।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती



# महापालिकेच्या PRO विभागात कोट्यवधींचा गैरव्यवहार?

## फोटोग्राफी-व्हिडिओग्राफी निविदेत एकाच कंत्राटदाराला चार वर्षे 'रान मोकळे'

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या माहिती व जनसंपर्क विभागामार्फत (PRO) राबविण्यात आलेल्या कोट्यवधी रुपयांच्या निविदा प्रक्रियांमध्ये गंभीर आर्थिक अनियमितता, शासकीय नियमांचे उघड उल्लंघन आणि कंत्राटदारांची मक्तेदारी झाल्याचा गंभीर आरोप करत भाजपा नगरसेवक विनोद नढे यांनी थेट राज्याच्या मुख्यमंत्र्यांकडे सविस्तर तक्रार दाखल केली आहे. मुख्य लेखापरीक्षण विभागाने स्वतः नोंदवलेले आक्षेप डावलून हा गैरव्यवहार झाल्याचा दावा तक्रारीत करण्यात आला आहे.**




नगरसेवक नढे यांनी १५ सप्टेंबर रोजी मुख्यमंत्र्यांना पाठवलेल्या पत्रात दोन स्वतंत्र प्रकरणांचा उल्लेख करत उच्चस्तरीय चौकशीची मागणी केली आहे — एक, फोटोग्राफी व व्हिडिओग्राफी निविदेतील मक्तेदारी, आणि दोन, 'सिटी हब फॉर डेटा अँड कम्युनिकेशन' (CHDC) या २२ कोटींहून अधिक किमतीच्या प्रकल्पातील तब्बल २० लेखापरीक्षण आक्षेप.

नगरसेवक नढे यांनी कंत्राटदाराने मुदतीत सुरक्षा ठेव न भरल्याप्रकरणी निविदा अटींनुसार कारवाई करून काळ्या यादीत समावेश झाला की नाही, याचा खुलासा करण्याची मागणी केली. निविदा प्रक्रिया रखडवणाऱ्या संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांवर महाराष्ट्र नागरी सेवा नियम व MMC Act कलम ५६ अन्वये निलंबन आणि खातेनिहाय चौकशी करावी, अशी मागणी करण्यात आली. स्पर्धात्मक दर डावलल्याने व मुदतवाढीमुळे महापालिकेचे झालेले आर्थिक नुकसान संबंधित अधिकाऱ्यांकडून 'सरचार्ज' लावून वसूल करावे, असे त्यांनी म्हटले. तसेच मुख्य दक्षता व नियंत्रण अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली स्वतंत्र उच्चस्तरीय समिती नेमून १५ दिवसांत चौकशी अहवाल सादर करावा आणि डेटा सुरक्षिततेचा भंग झाल्यास सायबर व आयटी कायद्यांतर्गत कारवाई करावी, अशी मागणी केली.

### एकाच कंत्राटदाराला वारंवार बेकायदेशीर मुदतवाढ?

तक्रारीनुसार, मे. दर्शन डिजिटल या कंत्राटदाराला निविदा क्र. ०३/२०१८-१९ अंतर्गत केवळ एक वर्षासाठी (१५ सप्टेंबर २०२० पर्यंत) २० लाख ८३ हजार रुपयांचे काम देण्यात आले होते. मुदत संपल्यानंतर तत्कालीन आयुक्तांनी ३ मार्च २०२१ रोजी "Call fresh tender, no extension is allowed" असा स्पष्ट लेखी आदेश दिला असतानाही, प्रशासनाने नवी निविदा प्रक्रिया जाणीवपूर्वक लांबवत त्याच कंत्राटदाराला वर्षानुवर्षे मुदतवाढ दिल्याचा आरोप तक्रारीत आहे. याशिवाय, २०२१ मधील निविदेत सर्वात कमी दर देणाऱ्या दोन्ही बोलीदारांनी सुरक्षा ठेव भरण्यास असमर्थता दर्शवल्यानंतर नवी निविदा प्रक्रिया तातडीने राबवणे अपेक्षित असताना ती जाणीवपूर्वक रखडवून जुन्याच दराने मे. दर्शन डिजिटल यांच्याकडून काम सुरू ठेवले गेल्याचेही तक्रारीत नमूद आहे.

### CHDC प्रकल्पात लेखापरीक्षकांचे आक्षेप

- मूळ निविदा अटी-शर्तींवर संबंधित कंत्राटदाराची स्वाक्षरीच नव्हती, तसेच अंदाजपत्रक समितीच्या इतिवृत्तांवर व दरपृथक्करणावरही सक्षम अधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या नसल्याचे लेखापरीक्षणात नमूद आहे.
- निविदेतील काही अटी स्पर्धेला बाधा आणणाऱ्या (TAILOR-MADE) असल्याचा संशय लेखापरीक्षणाने व्यक्त केला आहे.
- महापालिकेचा संवेदनशील डेटा व नागरिकांच्या वैयक्तिक माहितीच्या मालकी हक्काबाबत (DATA OWNERSHIP) करारात कोणतीही स्पष्ट तरतूद नसल्याचा आक्षेप आहे.
- मूळ उद्देश डेटा संकलन व विश्लेषण असताना प्रत्यक्षात खासगी कर्मचाऱ्यांमार्फत जनसंपर्क विभागाची नियमित कामे (कंटेंट रायटिंग, शूटिंग, इव्हेंट मॅनेजमेंट) करवून घेतली जात असल्याचा आरोप आहे.
- तक्रार निवारण प्रणालीत प्रत्यक्ष निवारण न करता केवळ प्रणालीवर 'RESOLVED/CLOSED' दाखवून नागरिकांची दिशाभूल केली जात असल्याचाही आक्षेप नोंदवण्यात आला आहे.
- करारानुसार ५% बँक गॅरंटी १३ जानेवारी २०२८ पर्यंत आवश्यक असताना, केवळ ५ जानेवारी २०२८ पर्यंतची बँक गॅरंटी स्वीकारून कंत्राटदाराची जवळपास २६ लाख रुपयांची बयाणा रक्कम परत करण्याची प्रशासकीय घाई संशयास्पद असल्याचे तक्रारीत म्हटले आहे.

# अण्णासाहेब मगर स्टेडियममधील जलतरण तलावाच्या दुरुस्तीला गती!

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**नेहरूनगर येथील अण्णासाहेब मगर स्टेडियममधील जलतरण तलावाच्या दुरुस्तीच्या कामाला गती मिळाली आहे. पिंपरी-चिंचवडच्या माजी महापौर तथा नगरसेविका डॉ. वैशाली घोडेकर यांनी जलतरण तलावाची प्रत्यक्ष पाहणी करून लिकेजची समस्या तातडीने दूर करण्याचे आदेश संबंधित अधिकाऱ्यांना दिले आहेत.**



> नेहरुनगर नागरिकांना जलतरण तलावासह परिसरातील सर्व सुविधांचा सुरक्षित आणि सुरळीतपणे वापर करता यावा, यासाठी आवश्यक ती संपूर्ण कार्यवाही केली जाणार आहे. दुरुस्ती आणि स्वच्छतेची कामे वेळेत पूर्ण व्हावीत, यासाठी सातत्याने पाठपुरावा करणार असल्याचे डॉ. वैशाली घोडेकर यांनी स्पष्ट केले. "जलतरण तलावातील लिकेजची समस्या तातडीने आणि कायमस्वरूपी दूर करण्यात यावी. तलावासह स्वच्छतागृहे, हॉल आणि संपूर्ण परिसर स्वच्छ व सुरक्षित ठेवावा. बेबी स्विमिंग पूलही आवश्यक कामे पूर्ण करून लवकर सुरू करावा. नागरिकांना दर्जेदार सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी या सर्व कामांचा नियमित पाठपुरावा करण्यात येईल.
>
> **- डॉ. वैशाली घोडेकर, माजी महापौर तथा नगरसेविका, पिंपरी-चिंचवड.**

जलतरण तलावामध्ये निर्माण झालेल्या लिकेजच्या समस्येमुळे हा तलाव काही काळ बंद ठेवण्यात आला होता. त्यामुळे नियमित जलतरण करणारे नागरिक, खेळाडू, विद्यार्थी आणि परिसरातील लहान मुलांची मोठी गैरसोय होत होती. या समस्येची दखल घेत डॉ. वैशाली घोडेकर यांनी तलावाला भेट देऊन परिस्थितीचा सविस्तर आढावा घेतला.

लिकेज नेमके कोणत्या ठिकाणी होत आहे, हे शोधण्यासाठी तलावामध्ये पाणी भरून प्रत्यक्ष तपासणी करण्यात आली. यावेळी तलावाच्या विविध भागांची पाहणी करून आवश्यक दुरुस्तीच्या कामांबाबत अधिकाऱ्यांशी चर्चा करण्यात आली. लिकेजची समस्या कायमस्वरूपी दूर होईल, अशा पद्धतीने तांत्रिक आणि दर्जेदार दुरुस्ती करण्याचे स्पष्ट निर्देश डॉ. घोडेकर यांनी दिले. तलावाच्या दुरुस्तीपुरते काम मर्यादित न ठेवता संपूर्ण परिसरातील सुविधांमध्ये सुधारणा करण्यावरही त्यांनी भर दिला. जलतरण तलावाजवळील स्वच्छतागृहे, हॉल आणि आजूबाजूच्या परिसराची तातडीने स्वच्छता करण्याचे आदेश देण्यात आले. तसेच लहान मुलांसाठी असलेला बेबी स्विमिंग पूल आवश्यक दुरुस्ती, स्वच्छता आणि सुरक्षिततेची तपासणी करून लवकरात लवकर सुरू करण्याच्या सूचनाही संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या.

तलाव परिसरातील उर्वरित दुरुस्तीच्या कामांची माहिती घेऊन ती सर्व कामे प्राधान्याने पूर्ण करावीत, असेही डॉ. घोडेकर यांनी अधिकाऱ्यांना सांगितले. कामांच्या गुणवत्तेबाबत कोणतीही तडजोड केली जाऊ नये आणि नागरिकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देण्यात यावे, अशी भूमिका त्यांनी मांडली. अण्णासाहेब मगर स्टेडियममधील जलतरण तलावाचा नेहरूनगरसह परिसरातील नागरिक मोठ्या प्रमाणावर वापर करतात. विद्यार्थी आणि खेळाडूंच्या जलतरण प्रशिक्षणासह नागरिकांच्या आरोग्य आणि व्यायामासाठी हा तलाव महत्त्वाचा आहे. त्यामुळे दुरुस्तीचे काम वेगाने पूर्ण करून तलाव पुन्हा नागरिकांच्या सेवेत सुरू करण्याची मागणी होत होती. डॉ. वैशाली घोडेकर यांच्या प्रत्यक्ष पाहणीमुळे आता या कामांना गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# मोशी कचरा डेपोला आणखी कचरा नको

## नगरसेवक निखिल बोऱ्हाडे यांचे आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांना निवेदन

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**मोशी कचरा डेपो येथे आणखी सात गावांचा कचरा आणून टाकण्याच्या प्रस्तावाला मोशी ग्रामस्थांनी तीव्र विरोध दर्शविला आहे. मोशी परिसरावर आधीच कचरा व्यवस्थापनाचा मोठा भार असताना त्यात आणखी भर घालू नये, अशी मागणी नगरसेवक तथा 'क' क्षेत्रीय कार्यालय (विजयदुर्ग) सभापती निखिल बोऱ्हाडे यांनी केली आहे. याबाबत त्यांनी पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांना निवेदन देऊन सात गावांचा कचरा मोशी येथे टाकण्याची कार्यवाही तात्काळ थांबवून पर्यायी जागा निश्चित करण्याची मागणी केली आहे.**




मोशी कचरा डेपो परिसरात यापूर्वीपासूनच पिंपरी-चिंचवड शहरातील विविध भागांमधून मोठ्या प्रमाणात कचरा आणला जातो. या परिसरात यापूर्वी गंभीर दुर्घटनाही घडली आहे. त्यामुळे कचरा डेपोच्या सुरक्षिततेचा तसेच परिसरातील नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. या पार्श्वभूमीवर आणखी सात गावांचा कचरा मोशी येथे आणणे योग्य ठरणार नाही, अशी भूमिका बोऱ्हाडे यांनी निवेदनातून मांडली आहे.

सात गावांचा कचरा मोशी येथे टाकण्याची कार्यवाही तात्काळ थांबवून, त्या गावांसाठी मोशीच्या बाहेर स्वतंत्र पर्यायी जागा निश्चित करावी. तसेच पर्यावरणपूरक आणि शास्त्रोक्त कचरा व्यवस्थापनाची व्यवस्था उभारावी, अशी स्पष्ट भूमिका निखिल बोऱ्हाडे यांनी निवेदनातून मांडली आहे.

मोशी कचरा डेपोच्या जवळच सुमारे ८०० बेडचे रुग्णालय असून, परिसरात झपाट्याने नागरीकरण आणि लोकसंख्या वाढत आहे. अशा परिस्थितीत कचरा डेपोचा विस्तार अथवा अतिरिक्त कचरा आणल्यास हवा, पाणी, नदी-नाले आणि एकूणच पर्यावरणावर त्याचा परिणाम होण्याची शक्यता आहे. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने प्रशासनाने या प्रश्नाकडे गांभीर्याने पाहण्याची आवश्यकता असल्याचे बोऱ्हाडे यांनी म्हटले आहे.

मोशी परिसरातील नागरिकांनी यापूर्वीच कचरा डेपोचा मोठा भार सहन केला आहे. त्यामुळे आता आणखी सात गावांचा कचरा मोशी येथे आणून टाकण्यास ग्रामस्थांचा ठाम विरोध आहे. विद्यमान कचरा व्यवस्थापनाच्या समस्या सोडविण्याऐवजी त्याच ठिकाणी अतिरिक्त कचरा आणणे हा परिसरातील नागरिकांवर अन्याय ठरेल, अशी भूमिका निवेदनातून मांडण्यात आली आहे. महानगरपालिकेने प्रथम पिंपरी-चिंचवड शहरासाठी नियोजित कचरा प्रक्रिया प्रकल्प पूर्ण क्षमतेने कार्यान्वित करावा. त्यानंतर भविष्यात निर्माण होणाऱ्या अतिरिक्त कचऱ्याचे शास्त्रोक्त पद्धतीने व्यवस्थापन करण्यासाठी स्वतंत्र नियोजन करावे, अशी मागणीही करण्यात आली आहे.

### दुर्लक्ष झाल्यास कायदेशीर मार्गाने आंदोलन

मोशी परिसरातील नागरिकांचे आरोग्य, पर्यावरण, नदी-नाले, वाढती लोकसंख्या आणि भविष्यातील नागरी विकास या सर्व बाबींचा विचार करून प्रशासनाने या निर्णयाचा फेरविचार करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. प्रशासनाने ग्रामस्थांच्या मागणीकडे गांभीर्याने लक्ष न दिल्यास नागरिकांच्या हितासाठी लोकशाही व कायदेशीर मार्गाने तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही नगरसेवक निखिल बोऱ्हाडे यांनी दिला आहे. मोशीवरील कचऱ्याचा वाढता भार, नागरिकांचे आरोग्य आणि पर्यावरणाचा प्रश्न लक्षात घेता आता प्रशासन या निवेदनावर काय भूमिका घेते, याकडे मोशी ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

> सदर सात गावांचा अद्याप पिंपरी-चिंचवड महानगरपालिका हद्दीत अधिकृत समावेश झालेला नाही, तरी या गावांचा कचरा मोशी येथे आणण्याचा घाट कशासाठी? या गावांचा कचरा सध्या मोशी येथे आणून टाकल्यास मोशी परिसरातील नागरिकांवर अतिरिक्त भार पडणार आहे. त्यामुळे समस्त मोशी ग्रामस्थांचा याला तीव्र विरोध आहे.. भविष्यात या गावांचा महापालिका हद्दीत समावेश झाला तरी त्यांच्या कचरा व्यवस्थापनासाठी स्वतंत्र नियोजन करून योग्य पर्यायी व्यवस्था उभारावी.
>
> - निखिल बोऱ्हाडे, नगरसेवक, अध्यक्ष 'क' प्रभाग (विजयदुर्ग) क्षेत्रीय कार्यालय.

# वृक्षछाटणीतून निघणारे लाकूड अंत्यविधीसाठी मोफत देण्याचा पर्यावरणपूरक निर्णय..!

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या उद्यान विभागामार्फत शहरातील विविध भागांमध्ये करण्यात येणाऱ्या वृक्षछाटणीतून जमा होणाऱ्या लाकडाचा आता विधायक आणि सामाजिक उपयोग होणार आहे. हे लाकूड महापालिका हद्दीतील स्मशानभूमींमध्ये अंत्यविधीसाठी मोफत उपलब्ध करून देण्यात यावे, अशी महत्त्वपूर्ण उपसूचना नगरसेविका, स्थायी समिती सदस्य तथा 'अ' क्षेत्रीय कार्यालयाच्या सभापती अर्चना अक्षय करांडे यांनी स्थायी समितीच्या बैठकीत मांडली.**



अर्चना करांडे यांच्या या पर्यावरणपूरक आणि सामाजिक संवेदनशीलतेचा विचार करणाऱ्या उपसूचनेला स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांच्यासह सर्व सदस्यांनी एकमताने मंजुरी दिली.

महापालिकेच्या हद्दीत नियमितपणे धोकादायक किंवा वाहतुकीला अडथळा ठरणाऱ्या झाडांच्या फांद्या आणि वृक्षछाटणीचे अवशेष मोठ्या प्रमाणात जमा होतात. अनेकदा या लाकडाची विल्हेवाट लावण्याची प्रक्रिया स्वतंत्रपणे करावी लागते. मात्र, या लाकडाचा उपयोग अंत्यविधीसाठी केल्यास एकीकडे त्याची योग्य पद्धतीने विल्हेवाट लागणार असून दुसरीकडे स्मशानभूमींमध्ये अंत्यविधीसाठी येणाऱ्या नागरिकांना लाकूड खरेदीचा आर्थिक भार कमी होण्यास मदत होणार आहे. विशेष म्हणजे, 'वृक्षछाटणीतून निघणाऱ्या लाकडाचा पुनर्वापर आणि सामाजिक उपयोग' या संकल्पनेतून पर्यावरण संवर्धन आणि सामाजिक बांधिलकी यांचा सुंदर समन्वय साधला जाणार आहे. त्यामुळे अर्चना करांडे यांच्या या अभिनव संकल्पनेचे नागरिकांकडून स्वागत होत आहे.

> महापालिकेच्या उद्यान विभागाने वृक्षछाटणीतून जमा होणाऱ्या लाकडाचे योग्य संकलन, वर्गीकरण आणि साठवणूक करून ते शहरातील विविध स्मशानभूमींना अंत्यविधीसाठी उपलब्ध करून देण्याची कार्यपद्धती निश्चित करणे अपेक्षित आहे. पर्यावरणाचे रक्षण करताना उपलब्ध नैसर्गिक संसाधनांचा गरजू नागरिकांच्या उपयोगासाठी पुनर्वापर करण्याचा हा निर्णय सामाजिक संवेदनशीलतेचा आदर्श ठरावा असा आमचा प्रयत्न आहे.
>
> - अर्चना अक्षय करांडे नगरसेविका, स्थायी समिती सदस्य तथा 'अ' क्षेत्रीय कार्यालय सभापती.

# दिघी आणि चऱ्होलीतील कचरा प्रक्रिया प्रकल्प रद्द करा!

## ई प्रभाग अध्यक्षा अर्चना सस्ते यांचा तीव्र विरोध; आयुक्तांकडे मागणी

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**ई-प्रभाग (शिवनेरी) क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीतील दिघी तसेच चऱ्होली-चोविसावाडी परिसरात प्रस्तावित करण्यात आलेले कचरा प्रक्रिया प्रकल्प तात्काळ रद्द करण्यात यावेत, अशी आग्रही मागणी ई-प्रभागाच्या प्रभाग अध्यक्षा तथा नगरसेविका अर्चना सस्ते यांनी पिंपरी-चिंचवड महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्याकडे केली आहे. मोशी कचरा डेपोचा मोठा भार आधीपासूनच या क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीतील नागरिक सहन करत असताना, याच परिसरात आणखी दोन कचरा प्रक्रिया प्रकल्प प्रस्तावित करणे अन्यायकारक असल्याचे सस्ते यांनी स्पष्ट केले आहे.**



पिंपरी-चिंचवड महापालिका क्षेत्रातील घनकचरा व्यवस्थापनासाठी विविध ठिकाणी नवीन कचरा प्रक्रिया प्रकल्प उभारण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे समोर आले आहे. त्यामध्ये ई-प्रभाग (शिवनेरी) क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीतील दिघी आणि चऱ्होली-चोविसावाडी या परिसरांचाही समावेश असल्याचे निदर्शनास आले आहे. या पार्श्वभूमीवर सस्ते यांनी महापालिका प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्न उपस्थित करत या दोन्ही ठिकाणचे प्रस्ताव रद्द करण्याची मागणी केली आहे.

ई-प्रभागाच्या हद्दीतच मोशी कचरा डेपो कार्यरत असून, पिंपरी-चिंचवड शहरातील मोठ्या प्रमाणातील कचरा अनेक वर्षांपासून या ठिकाणी आणला जात आहे. त्यामुळे मोशीसह दिघी, डुडुळगाव, चऱ्होली, चोविसावाडी आणि लगतच्या परिसरातील नागरिकांना दुर्गंधी, धूर, धूळ, माश्या, डास, वाहतूक कोंडी, प्रदूषण तसेच आरोग्यविषयक समस्यांचा सामना करावा लागत असल्याचे सस्ते यांनी निवेदनात नमूद केले आहे.

त्यामुळे एका बाजूला या परिसरातील नागरिक आधीपासूनच कचरा व्यवस्थापनाचा परिणाम सहन करत असताना, त्याच क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीत आणखी दोन कचरा प्रक्रिया प्रकल्प उभारण्याचा प्रस्ताव म्हणजे स्थानिक नागरिकांवरील कचऱ्याचा भार आणखी वाढविण्याचा प्रकार असल्याचे त्यांनी म्हटले आहे. ई-प्रभागातील नागरिकांचे आरोग्य, पर्यावरण आणि परिसराचे भवितव्य लक्षात घेऊन महापालिका प्रशासनाने या प्रस्तावांबाबत तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी सस्ते यांनी केली आहे. प्रस्तावित प्रकल्पांच्या जागा रद्द न केल्यास ई-प्रभागातील स्थानिक नागरिकांना सोबत घेऊन तीव्र जनआंदोलन उभारावे लागेल, असा इशाराही त्यांनी प्रशासनाला दिला आहे.

> “ई-प्रभाग (शिवनेरी) क्षेत्रीय कार्यालयाची अध्यक्षा आणि परिसराची लोकप्रतिनिधी या नात्याने दिघी तसेच चऱ्होली-चोविसावाडी येथे प्रस्तावित करण्यात आलेल्या कचरा प्रक्रिया प्रकल्पांना आपला तीव्र विरोध आहे. महापालिका प्रशासनाने घनकचरा व्यवस्थापनासाठी दीर्घकालीन, वैज्ञानिक आणि विकेंद्रित नियोजन करणे आवश्यक आहे. मात्र, एका विशिष्ट परिसरावरच कचरा व्यवस्थापनाचा अतिरिक्त भार टाकण्याऐवजी शहरातील सर्व क्षेत्रीय कार्यालयांमध्ये तो समान पद्धतीने विभागला जाणे गरजेचे आहे.
>
> - अर्चना सस्ते, सभापती, ई-प्रभाग (शिवनेरी) क्षेत्रीय कार्यालय, तथा नगरसेविका

### सस्ते यांच्या तीन प्रमुख मागण्या

- दिघी आणि चऱ्होली-चोविसावाडी येथील प्रस्तावित कचरा प्रक्रिया प्रकल्प तात्काळ रद्द करावेत.
- मोशी कचरा डेपोचा विद्यमान भार लक्षात घेऊन ई-प्रभाग (शिवनेरी) क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीत कोणताही नवीन कचरा प्रक्रिया प्रकल्प प्रस्तावित करू नये.
- मोशी कचरा डेपोमुळे ई-प्रभागावर आधीपासून असलेला घनकचरा व्यवस्थापनाचा भार अधिकृतपणे विचारात घ्यावा.

### प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयाला एक प्रकल्प

मोशी कचरा डेपोवर सुमारे दोन महिन्यांपूर्वी झालेल्या दुर्घटनेनंतर महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत घनकचरा व्यवस्थापनाच्या विकेंद्रीकरणाबाबत चर्चा झाली होती. त्यावेळी शहरातील प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीत प्रत्येकी एक कचरा प्रक्रिया प्रकल्प उभारण्याचे आश्वासन देण्यात आल्याचा दाखला सस्ते यांनी दिला आहे. घनकचरा व्यवस्थापनाचा भार सर्व क्षेत्रीय कार्यालयांमध्ये समान आणि न्याय्य पद्धतीने विभागण्याच्या उद्देशाने हा निर्णय घेण्यात आला होता. मात्र, अनेक क्षेत्रीय कार्यालयांच्या हद्दीत कचरा प्रक्रिया प्रकल्प प्रस्तावित नसताना मोशी कचरा डेपोचा भार आधीपासूनच सहन करणाऱ्या ई-प्रभागातच आणखी दोन प्रकल्प प्रस्तावित करणे हे या भूमिकेशी विसंगत असल्याचे सस्ते यांनी निदर्शनास आणून दिले आहे.

---

# राजमाता जिजाऊ शिक्षण प्रसारक मंडळाच्या डुडुळगाव कॅम्पसमध्ये गणरायाचे आगमन

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**ढोल-ताशांचा गजर, ‘गणपती बाप्पा मोरया’चा जयघोष आणि भक्तिमय वातावरणात राजमाता जिजाऊ शिक्षण प्रसारक मंडळाच्या डुडुळगाव कॅम्पसमध्ये श्री गणरायाचे उत्साहात आगमन झाले. गणरायाच्या आगमनाने संपूर्ण कॅम्पस भक्तिमय आणि आनंदमय वातावरणाने भारावून गेला.**



गणेशोत्सवानिमित्त कॅम्पसमध्ये आकर्षक व पारंपरिक पद्धतीने सजावट करण्यात आली होती. विद्यार्थ्यांसह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी मोठ्या उत्साहाने गणरायाचे स्वागत केले. विधिवत गणेशमूर्तीची स्थापना करून पूजा व आरती करण्यात आली.

या सोहळ्यास संस्थेचे अध्यक्ष व भोसरी विधानसभेचे प्रथम आमदार श्री. विलासराव लांडे पाटील, सचिव श्री. सुधीर मुंगसे, खजिनदार श्री. अजित गव्हाणे, विश्वस्त श्री. विक्रांतजी लांडे व श्री. सुमित मुंगसे यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच MBA महाविद्यालयाचे संचालक, फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य, वरिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य तसेच कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य उपस्थित होते. मान्यवरांच्या उपस्थितीत गणरायाची आरती करण्यात आली.

गणरायाच्या आगमनामुळे कॅम्पसमध्ये उत्साहाचे आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले. विद्यार्थ्यांनी गणेशोत्सवानिमित्त आयोजित विविध उपक्रमांमध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. ‘गणपती बाप्पा मोरया, मंगलमूर्ती मोरया’ या जयघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला.

गणेशोत्सवाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये एकता, सांस्कृतिक मूल्ये, सामाजिक बांधिलकी तसेच पर्यावरणपूरक उत्सवाचे महत्त्व रुजविण्याचा संदेश देण्यात आला. उत्साहपूर्ण आणि भक्तिमय वातावरणात गणरायाच्या आगमनाचा सोहळा उत्साहात संपन्न झाला.